Price Rs.: 3/-

स्टेट बँक ऑफ इंडिया, पेन्शनर्स असोसिएशन, (मुंबई सर्कल), पुणे
ह्यांची गृहपत्रिका

# संवाद

।। स्वयमेव मृगेंद्रता ।।

मनामनांचा मेळ जुळावा द्वेषाचा लवलेश नसावा
सादासी प्रतिसाद मिळावा वाद नको संवाद असावा

वर्ष चौथे अंक सहावा जुलै २००७ (July - 2007)

## संपादकीय

**प्रिय वाचकहो, सादर नमस्कार !**

नुकतीच आपली ३३वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोलापूर शहरी दि. १३ जुलै २००७ रोजी संपन्न झाली. सोलापूर येथील सुप्रसिद्ध सिद्धेश्वराच्या कृपेने सभा अत्यंत खेळी-मेळीच्या वातावरणात व उत्साहात पार पडली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर वार्षिक सोहळा आयोजित करणे व तो यशस्वी करणे हे अत्यंत कठीण काम आहे. परंतु हे शिवधनुष्य सोलापूर येथील वयाची ऐंशी ओलांडलेल्या ज्येष्ठांपासून अगदी अलीकडेच स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या तरुण पेन्शनरांपर्यंत सर्व कार्यकर्त्यांनी लीलया पेलले. अत्यंत मेहनत घेऊन हा कार्यक्रम सुनियोजितरित्या पार पाडला. कार्यकर्त्यांची कामाची लगबग व धावपळ कौतुकास्पद होती. त्या सर्व कार्यकर्त्यांना मनापासून धन्यवाद !

आपली संघटना आता ३४ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. १९७५ साली श्री. पाबळकर व सहकाऱ्यांनी लावलेल्या ह्या लहानशा रोपट्याचे एका मोठ्या वटवृक्षात आज रूपांतर झाले आहे. जेव्हा ही संघटना स्थापन झाली तेव्हा श्री. पाबळकर यांचे वय ७२ वर्षाचे होते. नंतरही ते सन् १९८६ पर्यंत संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून काम पहात होते. सुरवातीला २४ सभासद असलेल्या संघटनेची आज रोजी सभासद संख्या १४००० पर्यंत पोहोचली आहे. संघटनेचे कामही अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सुरू आहे. दरवर्षी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी ज्या उत्साहाने सभासद हजेरी लावीत असतात, तो त्यांचा उत्साह खरोखरच कौतुकास्पद आहे. जुन्या सहकारी मित्रांच्या भेटी घेत असतांना अवर्णनीय आनंद मिळत असतो. भूतकाळातील रम्य आठवणीत रमणे, गतस्मृतींना उजाळा देणे, त्याचबरोबर न येऊ शकलेल्या सभासदांची आस्थेवाईकपणे चौकशी करणे, हे सर्व अनुभवणे हजर असलेल्यांनाच शक्य आहे. जे सभासद काही कारणास्तव येऊ शकत नाहीत त्यांनाही नंतर हुरहुर लावणारा हा सोहळा असतो.

ह्या सभेत संघटनेत विविध स्तरावर कार्यरत असलेल्या, निरपेक्ष व सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची ह्या निमित्ताने सर्वसाधारण सभासदांना ओळख होते व त्यांच्या अभिनंदनाच्या व सत्काराच्या प्रथेने कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित होतो.

हीच भूमिका मनाशी बाळगून संघटना दरवर्षी एका असामान्य अशा कार्यकर्त्याची निवड करून त्याला "पाबळकर सुवर्ण पदक" देवून गौरव करते. यंदा हा मान पुणे येथील ज्येष्ठ आणि अनुभवी कार्यकर्ते श्री. मधुकर उर्फ अण्णा पालकर यांना देण्यात आला.

त्यांच्या कार्याचा यथार्थ गौरव करणारा श्री. दांडेकर साहेबांचा लेख आपण 'संवाद' च्या मागील अंकात वाचला असेलच.

आपल्या संघटनेच्या होत असलेल्या वाढीमध्ये ४ ।। वर्षापासून आपण सुरू केलेल्या 'संवाद'चा मोलाचा सहभाग आहे, याचा आम्हाला अभिमान वाटतो. 'संवाद' च्या माध्यमातून दर महिन्याला आपली भेट होत असते आणि होणाऱ्या प्रगतीची माहिती नियमितपणे आपल्याला मिळत असते. 'संवाद' हे आपले मनामनांचा मेळ जुळविणारे प्रभावी माध्यम झाले आहे. सर्व सभासद दरमहा 'संवाद' ची आतुरतेने वाट पहात असतात हे आम्हाला मिळणाऱ्या प्रतिक्रियांवरून दिसून आले आहे.

संघटनेच्या वाढीमध्ये 'संवाद' चा सहभाग या पुढेही चालूच राहील.

**- वसंत धुपकर,** पुणे

## Banks's Pensioners' Meet

The Bank's Pensioners' Meet was held on 13th July 2007 at Shri. Gujrati Mitra Mandal Hall, Solapur at 3.30 p.m. It was attended by Shri. S.K. Devrukhkar, AGM (PPG, Mumbai L.H.O.), Shri. S.A.Kulkarni, Dy.Manager (PPG, Mumbai L.H.O.), Shri. N.B.Savale, Dy.Manager (Per & HR), Pune (Z.O.) and Mrs. Ghodke (Per & HR) Pune Z.O.

**- Secretary**

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे

### दि.१३ जुलै २००७ रोजी सोलापूर येथे झालेल्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा घेतलेला धावता आढावा

'नमस्कार, राजोपाध्येसाहेब !', - 'अरे, किती वर्षांनी आपण भेटतो आहोत नाही ? हल्ली माझेही गुडघे 'बोलू' लागलेत, त्यामुळे बाहेरगावी जाऊन कुणाच्या भेटी-गाठी घेणं जमत नाही.', 'काय वहिनी, किती दिवसांनी आपल्या गाठी पडल्यात नाही ? तुमची प्रज्ञा काय करते हल्ली ? आणि जोशांचा सुनील शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेला जातोय म्हणे. लहानपणी किती खोडकर होता, नाही?' - अशा आपुलकी जपणाऱ्या विविध प्रतिक्रिया परवाच्या १३ जुलैच्या सोलापूर येथे भरलेल्या आपल्या असोसिएशनच्या ३३ व्या वार्षिक सभेसाठी जमलेल्या अनेक सभासदांच्या तोंडी एकमेकांच्या प्रथम भेटीत ऐकू येत होत्या. त्यावेळी झालेल्या हस्तांदोलनांनी व गळाभेटीने रंगलेल्या गप्पा ऐकणे हा एक दुर्मिळ योग होता. त्यात भर पडली ती सोलापूरकर मंडळींनी केलेल्या सुनियोजित व आपुलकीच्या स्वागताने. जणूकांही आपल्या घरचेच कार्य असून, आपल्या पाहुण्यांची बडदास्त चांगली व्हावी असा प्रयत्न सर्व कार्यकर्ते करत होते. तिकडे पंढरीला 'माऊलीच्या' भेटीसाठी ज्या निष्ठेने वारकरी आषाढी/कार्तिकीला जमतात तसेच काहीसे भाव मनात बाळगून, आपल्या असोसिएशनच्या अशा वार्षिक सभेला येणारे अनेक सभासद, सभेच्या व्यवस्थापनात गेल्या ४-५ वर्षात झालेला चांगला बदल पाहून भरभरून कौतुक करत होते. अर्थात, या सर्व गोष्टींचे श्रेय आपल्या फेडरेशनचे सर्वेसर्वा श्री.दांडेकरसाहेबांच्या मार्गदर्शनांस व श्री.पालकर यांनी आपल्या स्वानुभवसिद्ध लिहिलेल्या 'वार्षिकसभा नियोजन' पुस्तिकेला दिल्यास वावगे ठरू नये.

श्री.शशीकांत लावणीस यांनी आपल्या दमदार अशा आवाजात लालित्यपूर्ण भाषेत सभेस सुरूवात केली. सौ.रश्मी वळसंगकर यांनी गोड स्वरात गायलेल्या ईशस्तवनाने सभेत रंग भरला. सभेच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार, मा.अध्यक्षांचे तसेच प्रमुख पाहुणे व पदाधिकाऱ्यांचे हस्ते 'दीपप्रज्वलन' व त्यांचे सत्कार, शुभसंदेश वाचन व दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहणे, गतवर्षीच्या वार्षिक सभेच्या वृत्तांतास मंजुरी देणे, ३१ मार्च २००७ अखेरीच्या लेखापरिक्षण झालेल्या असोसिएशनच्या आर्थिक पत्रकांना मंजुरी देणे, २००६-२००७ या वर्षाच्या कार्यकारी मंडळाच्या वार्षिक अहवालास मंजुरी देणे, वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ सभासदांचा हृद्य सत्कार व सौ.मीनाताई बर्वे यांचे 'शुभाशिर्वादपर' वैदिकमंत्रांचे पठण, तसेच ज्या सभासदांचा वाढदिवस वार्षिक सभेच्या दिनांकास असतो अशा सभासदांना शुभेच्छा इत्यादी विषयांची नेहमीप्रमाणेच पूर्तता झाली. ज्येष्ठ सभासद सत्काराचे वेळी पुणे झोनल सब-सेंटरचे सहचिटणीस श्री.अशोक पंडित यांनी सूत्रसंचालन केले.

या वार्षिक सभेत खालील व्यक्तींचे सत्कार करण्यात आले -

१) सभेचे प्रमुख पाहुणे, भुवनेश्वर सर्कल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.टी.आर.राव, तसेच तेथील जनरल सेक्रेटरी श्री.सत्पथी यांचा हार्दिक सत्कार करण्यात आला. यावेळी फेडरेशनचे अध्यक्ष मा.श्री.दांडेकर यांनी श्री.राव यांनी भुवनेश्वर सर्कल पेन्शनर्स असोसिएशनसाठी केलेल्या अमोल कार्याचा आढावा घेऊन त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले.

२) श्री.मधुकर दि.पालकर यांना या वर्षाचे 'कै.ल.ना.पाबळकर स्मृती सुवर्ण पदक' व 'मानपत्र' मा अध्यक्ष श्री.वि.मो.गोखले यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आले. याप्रसंगी मानपत्राचे वाचन व श्री.पालकर यांचेविषयी गुणगौरवपर भाषण असोसिएशनचे माजी-उपाध्यक्ष श्री.रबडे यांनी केले.

३) आपल्या सर्व सभासदांना दरवर्षी न चुकता, असोसिएशनतर्फे पाठवले जाणारे शुभेच्छापत्र शक्यतो त्यांचे वाढदिवशीच पोहोचेल अशा बेताने पाठवणारे व हे महत्त्वाचे काम गेली सहा वर्षाहून अधिक काळ अविरत करणारे श्री.माधव बापट यांचा सत्कार करण्यात आला. या कामात त्यांना मदत करणाऱ्या त्यांच्या घरच्या लोकांचा पण कौतुकाने उल्लेख करण्यात आला.

४) पुणे येथील आपली लायब्ररी गेली ४ वर्षे निष्ठेने चालवणारे सर्वश्री वाकचौरे , काळे, वैद्य व बेलसरे यांचा अध्यक्षांचे हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच ठाणे येथील असोसिएशनच्या कार्यालयात लायब्ररी चालवणारे श्री.कान्हेरे यांचा पण गौरवपूर्ण उल्लेख अध्यक्षांनी केला.

५) नाट्यक्षेत्रात मोलाचे योगदान देणारे व लायन्स क्लब, सोलापूर यांनी ज्यांना 'जीवनगौरव' पुरस्कार दिलेला आहे असे श्री.शशीकांत लावणीस यांचा सत्कार करण्यात आला.

६) १०० हून अधिक वेळा वैयक्तिक रक्तदानाचा विक्रम करणारे श्री.पद्माकर दाते व सौ.हेमलता दाते यांचा त्यांच्या सर्वश्रेष्ठ दानाबद्दल सत्कार करण्यात आला.

७) बार्शी येथील रक्तपेढीचे निवृत्तीनंतर निरलसपणे कार्य करणारे व ज्यांना 'बार्शीभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आलेले आहे अशा श्री.सुभाष जवळेकर यांचाही सत्कार करण्यात आला. स्थानिक सभासद पंडित अविनाश जोजारे यांचापण त्यांच्या संगीत साधनेबद्दल गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

८) आपले 'संवाद' मासिकाचे संपादनाचे बहुमोल कार्य गेली ४ वर्षे अत्यंत यशस्वीपणे सांभाळणारे संपादक मंडळाचे सदस्य

असोसिएशनच्या कार्यास शुभेच्छा- पृष्ठ प्रायोजन : एक हितचिंतक, दादर, मुंबई

सर्वश्री प्रभाकर गुपचुप, वसंत धुपकर, शरद शिंगवेकर, श्रीधर सहस्रबुद्धे व क्रांतीसेन आठवले यांचा मा.अध्यक्षांचे हस्ते हार्दिक सत्कार करण्यात आला.

९) 'संवाद' मासिकातर्फे यावर्षी घेतलेल्या लेखन-स्पर्धेतील पारितोषिक विजेत्यांचा मा.अध्यक्षांचे हस्ते हार्दिक सत्कार करून पारितोषिके प्रदान करण्यात आली. (विजेत्यांची नावे 'संवाद'च्या मे महिन्याच्या अंकात छापली आहेत.)

१०) आपल्या नागपूर सबसेंटरला गेल्यावर्षी मा.खासदार श्री.एकनाथजी ठाकूर यांनी रू. १,११,१११/- ची देणगी दिली. त्याच्या व्याजातून 'श्री.एन.जी.मोरे ट्रस्ट' तर्फे असोसिएशनचे उत्कृष्ठ काम करणारे - नागपूर शहरासाठीचे पारितोषिक श्री.वझिरानी यांना, तसेच विदर्भातील इतर जिल्ह्यांसाठी ठेवलेले पारितोषिक श्री.नागराज (अकोला) व श्री.हमीने (यवतमाळ) यांना जाहीर झाले त्याचा उल्लेख या सभेत करण्यात आला. अर्थात, या ट्रस्टचे व्यवस्थापन/हिशोब ठेवणे वगैरे सर्व काम पूर्णपणे नागपूर येथील ज्येष्ठ सभासदांच्या विश्वस्त मंडळाने, स्थानिक कार्यकर्त्यांच्या मदतीने करावे असे श्री.ठाकूर यांच्या इच्छेनुसार ठरविण्यात आलेले आहे. सर्व पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यानंतर फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी श्री.स.ब.गोखले व अध्यक्ष श्री.दांडेकर यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात फेडरेशन करीत असलेल्या पाठपुराव्यासंबंधीची माहिती व दिल्ली हायकोर्टातील केसची सद्यस्थिती विशद करून सांगितली. तसेच यापुढे दाखल करण्यात येणाऱ्या दाव्यांसंबंधीची माहितीही दिली.

वार्षिक सभेच्या दिवशी ४० सभासदांनी असोसिएशनला एकूण रू. १६८२२/- ची देणगी दिली. त्यांची नावे श्री.श्रीनिवास बर्वे यांनी वाचून दाखवली व सर्व देणगीदारांचे मन:पूर्वक आभार मानले. (सविस्तर यादी ऑगस्टच्या संवादमध्ये छापली जाईल)

या सभेचे वैशिष्ट्य हे की सोलापूरच्या श्री.तम्मा पाटील व श्री.बेंद्रे यांच्या नेतृत्वाखालील सर्व टीमने स्थानिक सभासदांकडून सोलापूर येथील वार्षिक सभेसाठी खास ऐच्छिक वर्गणी गोळा केली. एकूण ९१ सभासदांनी यात योगदान दिले व एकूण रू. ५२०६३/- जमा करून वार्षिक सभेच्या खर्चासाठी असोसिएशनला देणगीदाखल दिले. या सर्व उदार देणगीदारांचे मा.अध्यक्षांनी मन:पूर्वक आभार मानले व या उत्स्फूर्त व उल्लेखनीय कामाचे कौतुक केले.

यानंतर मा.अध्यक्ष श्री.गोखले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात गेल्या वर्षात असोसिएशनच्या सर्व सब्-सेंटर्सनी सर्व आघाड्यांवर केलेल्या उल्लेखनीय कार्याचा थोडक्यात आढावा घेऊन सर्व पदाधिकाऱ्यांचे व स्थानिक कार्यकर्त्यांचे कौतुक केले. तसेच सभासद नोंदणीचे १०० टक्क्यांचे उद्दिष्ट गाठण्याचे आवाहन केले. त्यांच्या मार्गदर्शनपर भाषणानंतर असोसिएशनतर्फे श्री.चंद्रकांत कुलकर्णी, पुणे झोनल सब्-सेंटरचे सेक्रेटरी यांनी आभार प्रदर्शनाचे काम केले. या सभेच्या यजमानपदाचा मान यावर्षी असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाने सोलापूर युनिटला दिला याबद्दल सर्व स्थानिक सभासदांतर्फे श्री.एम.डबल्यू देशपांडे यांनी सर्व कार्यकारी मंडळाचे मन:पूर्वक आभार मानले. तसेच सर्व उपस्थित सभासदांचे आदरातिथ्याचा स्वीकार करून, दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. सभेच्या शेवटी श्री.दत्तात्रय बेंद्रे यांनी सुरेल आवाजात 'पसायदान' गायल्यावर असोसिएशनच्या ३३ व्या वार्षिक सभेची यशस्वी सांगता झाली. सभेचे सूत्रसंचालन असोसिएशनचे मुंबई सर्कलचे सेक्रेटरी श्री.लळिंगकर यांनी केले.

आपापल्या गावी परतताना सभासदांच्या जिभेवर दोन्ही दिवसांच्या भोजनातील पदार्थांची चव रेंगाळली असणारच आणि जुन्या मित्रांच्या भेटीच्या आठवणींचे सुगंध मनात दरवळत राहीले नसतील तरच नवल !

**- रा.ना.लळिंगकर,** सेक्रेटरी

***टीप :- ३३ व्या वार्षिक सभेचा सविस्तर वृत्तांत ऑगस्ट महिन्याच्या संवादच्या अंकात देण्यात येईल.***

*****

अहो ! सोलापूरला मिटींगला जात आहांत तर मला शेंगदाण्याची चटणी आणा. तुमची कवळी असली तरी माझी बत्तीशी अद्याप शाबूत आहे.

**- मधुकर पालकर,** पुणे

## स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन नागपूर सेंटर अमरावती युनिट

पेन्शनर्स असोसिएशनच्या अमरावती युनिटतर्फे निवृत्तीधारकांची ''रिजनल कॉन्फरन्स दि. २४.०६.०७ रोजी अमरावती शाखेच्या ''रंजन'' सभागृहात संपन्न झाली. प्रमुख पाहुणे श्री.संजय काळे, स.म.प्र.,क्षेत्र क्र.५ नागपूर झोनल ऑफिस हे होते. त्याचप्रमाणे श्री.राणे, मुख्य प्रबंधक (क्रेडिट) यांचेसह अमरावती शहरातील पाचही शाखांचे शाखा व्यवस्थापक हजर होते. तसेच नागपूर सब सेंटरचे झोनल सेक्रेटरी श्री.जयंत वकील व कार्यकारिणी सदस्य श्री.जयंत पांडे हेही मार्गदर्शनासाठी आवर्जून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांचे युनिटमधील ज्येष्ठ सदस्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आली. अमरावती मुख्य शाखेचे चीफ मॅनेजर श्री.हेमंत गोखले साहेब व अमरावती कॅंप शाखा तसेच दस्तूरनगर शाखेचे व्यवस्थापक यांनी सभागृहाला संबोधित करताना बँकेत सध्याच्या नवीन उेीश इरपज्ञळपस प्रणालीमुळे झालेल्या सोयी व काही तांत्रिक गैरसोयींची चर्चा करून ह्या पुढील काळात बँक पेन्शनरांना कोणत्याही प्रकारचा त्रास वा अडचणी येऊ न देण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले. प्रमुख अतिथी श्री.संजय काळे, स.म.प्र.नागपूर ह्यांनीसुद्धा आपल्या टीमच्या सहकार्याबद्दल व दिलेल्या आश्वासनाबद्दल समाधान व्यक्त करून झोनल ऑफिससुद्धा अडचणींचे निराकरण करण्यास तत्पर राहील असे सांगितले. ह्यानंतर संघटनेचे सचिव श्री.निमदेव यांनी गेल्या वर्षीचा अहवाल व जमा खर्चाचा आढावा सभेला सादर केला.

श्री.जयंत वकील, सचिव, ह्यांनी अमरावतीच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. आपल्या भाषणात Commutation, Income-Tax, Exit Option Retirement Scheme आणि कोअर बँकिंग मुळे कोणत्याही सवलती बँकेने कमी केल्या नाहीत असे सांगितले. सर्वात शेवटी ते म्हणाले की अमरावती युनिटची धुरा आता मजबूत हातात आहे व ते हात श्री.अविनाश, शाम आणि त्यांच्या कार्यकारिणी मंडळाचे आहेत.

शेवटी संघटनेच्या अमरावती युनिटचे अध्यक्ष श्री.श्याम कुऱ्हेकर ह्यांनी संघटनेया व सभेच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. श्री.मुकुंद जोशी ह्यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

**अविनाश निमदेव,** सचिव (अमरावती)

## कशावरून

***न्यायाधीश*** - *आरोपी दारू प्यायलेला होता असे तुम्ही कशावरून म्हणता?*

***साक्षीदार*** - *तो गाडीवाल्याशी जोरजोरात भांडत होता. त्याला अचकट विचकट शिव्या देत होता.*

***न्यायाधीश*** - *असेल. पण तेवढ्यावरून तो दारू प्यायला होता हे सिद्ध होऊ शकत नाही.*

***साक्षीदार*** - *पण गाडीवाला तिथे मुळी हजरच नव्हता ना!*

***- प्रभाकर गुपचूप*** (पुणे)

## *माझी आवड*

*नव्या युगाची, नव्या पिढीची*
*नवीन जनरीत*
*मात्र कशी ही आवड माझी*
*याच्या विपरीत!*
*फोन-मोबाईल एसएमएस आणि*
*चॅटिंगच्या संगे*
*देश-विदेशी तरुणाईची*
*मैफिल हो रंगे।*
*मात्र अजूनि मला आवडे*
*हृदयीची भाषा*
*पत्रामधुनी उलगडणारी*
*मनोमनीची आशा* ॥१॥
*गेंद गुलाबी, झेंडू-मोगरा*
*ऑस्टर जरबेरा*
*लिली-शेवंती निशिगंधाचा*
*पहा कसा तोरा*
*हार-गुच्छ अन् फुलमालांनी*
*परिसर होई धुंद*
*मात्र माझिया मना रिझवितो*
*बकुलफुलांचा गंध* ॥२॥
*अधिक पैसा, अधिक काम*
*ज्यादा सुविधा, ज्यादा दाम*
*सुख गवसेना धावले जरी*
*न घेता विश्राम*
*नवीन युगाच्या नवमंत्राने या*
*अवघे जीवन व्यस्त*
*मात्र अजूनि तन-मन माझे*
*आत्मरंजनी मस्त* ॥३॥
*जरि चंद्रावर पडले पाऊल*
*माणुसकीची नाही चाहुल*
*उंच मनोरे इमले माड्या*
*न कळे कसली पडली भूल*
*भव्य-दिव्य जरि शुष्कच सगळे*
*फिका पडेल हो रंग*
*एकच नामी उपाय त्यावरी*
*हरिनामाचा संग* ॥४॥

***- गोविंद करमरकर***, *सांगली*

# भेट-विश्वरत्नाची-संवाद विश्वरत्नाशी

****************

आचार्य अत्र्यांनी उत्स्फूर्तपणे 'विश्वरत्न' ही पदवी देऊन गौरविलेले प्रख्यात अंतरिक्ष शास्त्रज्ञ डॉ.जयंतराव नारळीकर यांचा आणि माझा कधी संबंध यईल असे स्वप्नातसुद्धा मला वाटले नव्हते. पण माझी वाचनाची आवड आणि जिज्ञासा, यामुळे तो योग आला खरा. मात्र त्याची सुरुवात वेगळ्याच संदर्भात झाली - 'परमार्थ प्रश्नोत्तरी' या श्रीदासराम महाराज केळकर यांच्या पुस्तकामुळे. या पुस्तकातील विवेचनावर डॉ. जयंतरावासारख्या शास्त्रज्ञांचे मत काय असेल ते समजून घ्यावे म्हणून त्या पुस्तकाची एक प्रत भेट म्हणून देण्यासाठी मी 'आयुका' मध्ये गेलो. समक्ष भेट झाली नाही. पण पुस्तक त्यांचेपर्यंत पोचवण्याची व्यवस्था झाली आणि आठ दिवसातच जयंतरावांनी स्वहस्ताक्षरात पत्र लिहूनआपले मत कळविले ते असे -

''विज्ञान वस्तुनिष्ठ तर धर्म श्रद्धेवर विसावत असल्याने काही बाबतीत दोघात मतभेद होतात. परंतु बहुतेक वैज्ञानिक (धार्मिक श्रद्धा न बाळगणारे) मानवतावादी दृष्टिकोन ठेवतात. त्यात आणि परमार्थ प्रश्नोत्तरातील काही प्रश्नोत्तरात तफावत नाही- सामंजस्यच आहे.

नंतर काही दिवसांनी जयंतरावांच्या आई श्रीमती इंदुमती यांचे 'गोष्टी रँगलरांच्या' हे पुस्तक माझ्या वाचनात आले. त्यात रँग्लर विष्णुपंत नारळीकरांच्या बनारसच्या वास्तव्यातील अनेक हृद्य आणि मनोरंजक घटना आहेत. विशेषत: त्यांच्या घरी होणारा भागवत सप्ताह, थोरामोठ्यांच्या भेटी आणि विशेष म्हणजे जयंतरावांच्या वडीलांनी वर्षानुवर्षे लिहिलेल्या दैनंदिनी (डायऱ्या) त्यात त्यांना आवडलेले उतारे आणि विशेष घटना. त्या समजून घेण्याच्या दृष्टीने त्या डायऱ्या मला पहाता येतील का ? अशी विचारणा करणारे पत्र मी जयंतरावांना लिहिले. त्यांचे 'अवश्य या आणि पहा' असे उत्तर आले आणि येथूनच मला जयंतरावांच्या वैशिष्ठ्यांची ओळख पटू लागली. शास्त्रज्ञाला अत्यावश्यक असणारी शिस्त, वेळ पाळण्याचा कटाक्ष, जिज्ञासा पुरी करण्याची तत्परता, या बरोबरच अभिजात सौजन्य आणि निरहंकारिता. त्यांच्या खगोलशास्त्राविषयासंबंधी काही शंका विचारण्याएवढेही मला ज्ञान नाही. याची कल्पना कदाचित त्यांना आली असावी. पण डायऱ्याविषयी कुतूहल का हे मात्र त्यांनी विचारले आणि अक्षरश: चाळीस वर्षांच्या डायऱ्या रचून ठेवलेले टेबल मला दाखविले आणि मनसोक्त पहा, वाचा असे सांगून ते चहा करण्याच्या तयारीस लागले. मी एकेक डायरी पाहून नोंद करून घेत होतो. ते पाहून जयंतराव मला म्हणाले, ''सहस्रबुद्धे, लिहून घेण्यात वेळ घालवू नका. पाहिजे तितक्या ठिकाणी खुणा घालून ठेवा, मी सर्व कांही झेरॉक्स करून पाठवून देतो. मग काय, मी भराभरा वाचन सुरू केले. खुणा ठेवू लागलो. मधून मधून जयंतरावांना संदर्भ विचारत होतो ते खुलासा करत होते. बनारसच्या गोष्टी सांगत होते नंतर चहापाणी झाले. गणितातील संशोधक असणाऱ्या विष्णुपंतांना भागवताचे आकर्षण का की ज्यामुळे प्रतिवर्षी त्याचे पारायण होते असे, ते अंशत: समजले. शिवाय काही महत्त्वाचे उतारे, काव्यपंक्ती होत्याच. पण ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये याचे भान मला होते. मी आवरते घेतले आणि उठलो. बरोबर कॅमेरा होता. वेगळ्या अर्थाने आकाशाशी नाते जडलेल्या जयंतरावांचे स्वतंत्र आणि त्यांच्यासमवेत जमिनीवरचा मी असे छायाचित्र घेतले. निरोपाचा नमस्कार करताना मी विचारले - आपल्या IUCAA म्हणजे आयुकांचे बोधवाक्य आहे की, आ-यु-का या अक्षरांनी सुरूवात असणारी एखादी रचना आहे का ? 'नाही.' त्यावर मी एक श्लोक केला तर चालेल का ? जयंतराव म्हणाले, 'अवश्य करा.' मी घरी परत असतानाच तो श्लोक तयार झाला. तो असा -

आकाशविज्ञानसंहिता
युक्ता भौतिकीसंशोधनार्था
कार्यशाला इयं भूयात् सकललोकमंगला ।

श्रीविस १९-१२-२००२

तसाच तो श्लोक कार्डावर लिहून जयंतरावांना पाठविला.

उलटटपाली जयंतरावांचे पत्र आले त्यात खालील मजकूर होता-

आपली भेट झाली त्याचे समाधान वाटते कारण आपण माझ्या वडिलांनी वेळोवेळी लिहून ठेवलेल्या सूक्तांचे रसग्रहण केले.

आपला श्लोक मिळाला पण छंद कुठला वापरला ते समजले नाही. (माझ्या स्वच्छंदाची ती एक कृती. त्याला कसला छंद असणार. श्रीविस) आणि खाली जयंतरावांनी केलेला श्लोक असा होता.

आकाशे निहित ध्याना
युक्ता संशोधने सदा ।
कार्यशाला इयं भूयात्
विद्यापीठ हितेरता ॥

Thinking about the Heavens and absorbed in research, let this working institute be devoted to the betterment of universities.

आणि खरेच सांगतो, जयंतरावांचा हा श्लोक सार्थ आहे, सरस आहे आणि सुलभही आहे.

माझ्या कुंडलीत पांडित्याचा योग नाही. पण पंडित मैत्रीचा योग निश्चित आहे त्याचे हे प्रत्यंतरच नव्हे का ?

**श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे,** पुणे
मोबाईल : ९८२३०८५३९०

*****

असोसिएशनच्या कार्यास शुभेच्छा- पृष्ठ प्रायोजन : एक हितचिंतक, अकोला

# Limericks

A" limerick'' is a five line humorous verse, somewhat like our Mmam{ir . The first two and the fifth lines rhyme with each other, and so do the third and fourth which are shorter. Arguably. it is the lowest form of poetry. but less arguably the highest form of humour. There are thousands of limericks in English language- from masters like Edward Lear and Ogden Nash to the several unprintable anonymous ones.

I have also been trying my hand at this form of verses for a long time. The first was over half a century back. When I lived on Queen's Road (now M. Karve Marg), when BEST buses ran on routes B, B1, D etc. in front of our house (Bus routes didn't bear numbers those days, perhaps so as not to confuse them with tram routes), and when my son was about four years old :-

There was a cheeky young kid Jeevan
who wanted to ride atop bus B-1,
when his harassed daddy
Took him to bus stop D,
He said, ''can't you read capitals even ?''

******

A few of my recent unpolished limericks follow :-

The State Bank wants to show its culture
By renovating its external structure
But customer and Staff
Would continue to laugh
If it didn't repair its ancient furniture

*******

Pakistan's President Mushrraf
Now blows smooth, now blows rough's
With Bush he legs on.
And ISI, he eggs on :
It's time we called his bluff.

*******

With South Africa we played Twenty 20,
Fewer overs but runs a-plenty
In your hours
victory was ours ;
bonus : Cheer-leaders, cute and dainty

*******

The cricket umpire named Darrel Hair,
Not so clean, not so fair,
He sent Inzy
Into a twiggy
Saying ''You nibbled the ball, and I don't care.''

*******

October 13 was again a Friday,
People sad it's the ''you'll cry" day.
But I was happy.
Not at all weeply-
You remember, it was not a dry day.

*******

Longtime spinster Condoleezza Rice.
Won't be branded the Maiden of Ice :
She said she'd wed.
But...... added
Just any Tom Dick Harry won't suffice.

*******

The French footballer named Zidane
Ended his top honours campaign
with a head-butt
In the apponent's gut,
But no, he wasn't insane.

***- P. S. Vaidya***

*24, Jayashree 75 Worli seaface, Mumbai 400030.*

*********

## The Most Important Discoveries

Man discovered weapons, invented hunting

Woman discovered hunting, invented furs

Man discovered colours, invented painting

Woman discovered painting, invented make-up

Man discovered speech, invented conversation

Woman discovered conversation invented gossip

Man discovered agriculture, invented food

Woman discovered food, invented diet

Man discovered friendship, invented love

Woman discovered love, invented marriage

Man discovered trade invented money

Woman discovered money man has never recovered

**- Shamrao Pote**,
Andheri, Mumbai

# व्यक्ति विशेष - श्री.विजय शेठ

आपले एक सभासद श्री.विजय शेठ यांना नुकतेच दि. २८ मार्च २००७ बुधवार रोजी पुणे येथील भरत नाट्य मंदिरात पुणे-पिंपरी विभागातील मध्यवर्ती ज्येष्ठ नागरिक संघटनेने (ASCOP) आयोजित केलेल्या स्पर्धेत पुणे शहरातील ''सर्वोत्कृष्ट गटप्रमुख'' म्हणून सन्मानित केले आहे. पुणे-पिंपरी परिसरात एकूण १०५ ज्येष्ठ नागरिक संघ आहेत व ते १४ गटात विभागले गेले आहेत.

मार्च २००१ मध्ये बँकेतून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारल्यानंतर त्यांनी शिवतीर्थनगर पौड रोड कोथरूड येथे स्नेहसंवर्धन ज्ये.ना.संघाची जाने.२००२ मध्ये स्थापना केली. संघाने आता सहाव्या वर्षात पदार्पण केले आहे. सभासद संख्या १८० पर्यंत पोहचली आहे.

संघाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून सुरूवात केल्यानंतर ते रीतसर संघाचे अध्यक्ष म्हणून लागोपाठ दोन वेळा निवडून आले. संघाचे कामकाज उत्कृष्ट चालू आहे. पौड रोड भागांत असलेल्या ८-१० संघात 'स्नेह संवर्धन ज्ये.ना.संघ' अत्यंत कार्यक्षमतेने चालविला जात आहे. त्यामुळे साहजिकच गटाचे नेतृत्व करण्याची संधी अध्यक्ष या नात्याने श्री.विजय शेठ यांचेवर आलेली आहे आणि ती जबाबदारी त्यांनी ''सर्वोत्कृष्ट गटप्रमुख'' म्हणून पुणे शहरांतून सन्मानित होवून पार पाडली आहे. त्याशिवाय राज्यस्तरावरील ज्ये.ना.महासंघात (FESCOM मध्ये) ते कोथरूडमधील सहा संघांचे समिती प्रमुख म्हणून काम पहात आहेत.

ह्याशिवाय श्री.विजय शेठ हे पुण्यातील ''दशावेमा गुजराथी'' समाजाचेही क्रियाशील कार्यकर्ते आहेत. समाजाचे ''श्रीविद्या उत्तेजक ट्रस्ट'' पुणे ह्या संस्थेच्या कार्यात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आहे.

पुणे हे विद्येचे माहेरघर आहे. पुणे येथे विशेषत: कोकणातील ग्रामीण भागातून महाविद्यालयीन व शिक्षणाचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थीनी येत असतात. त्यांच्या निवासाची सोय ह्या ट्रस्टमार्फत केली जाते. त्यासाठी संस्थेने १९६६ मध्ये वसतिगृह नळस्टॉप, एरंडवणा येथे सुरू केले. त्यात आज रोजी ५० विद्यार्थ्यांची रहाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. संस्थेने कोंढवा-कात्रज रोडवर नवीन वास्तूची उभारणी सुरू केली आहे.

ह्या संस्थेत सुरूवातीला श्री.विजय शेठ यांनी २००२ ते २००४ मध्ये सहसचिव म्हणून तर २००४ ते २००६ मध्ये सचिव म्हणून व आता नवीन इमारतीसाठी लागणारा निधी उभा करण्यासाठी खजिनदार म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे. निधी गोळा करण्यासाठी त्यांची पायपीट सतत सुरू आहे व त्यांना प्रतिसादही उत्तम मिळत आहे.

अत्यंत मनमिळावू वृत्ती, नेतृत्व गुण, सर्वांना बरोबर घेऊन कार्य करण्याची पद्धत, विचारपूर्वक संबंधितांशी चर्चा करून सकारात्मक

## *श्री.अेल.अे.डी.फर्नांडीस*
## *अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व !*

मे महिन्याचा आलेला आपला 'संवाद' वाचला. त्यांत श्री.एल.अे.डी. फर्नांडीस यांचे निधन झाल्याचं कळलं. वाईट वाटलं. एक चांगलं उमेद, सुस्वभावी व्यक्तिमत्त्व हरपलं. त्यांच्या विषयीच्या काही आठवणी मनात उफाळून आल्या.

४०/४५ वर्षापूर्वीची गोष्ट आहे. मी फॉरेन डिपार्टमेंटमध्ये टायपीस्ट होतो व श्री फर्नांडीस हे सुपरिटेण्डेंट होते. उंचपुरे असलेले फर्नांडीससाहेब टाय लावून, चष्मा घातलेले आणि बुटांचा खाड् खाड् आवाज करीत दमदारपणे पावलं टाकीत यावयाचे. त्यांच्या बुटांच्या आवाजावरून ते आल्याचे स्टाफला समजायचे व 'गुड मॉर्निंग सर' असे उद्‌गार स्टाफच्या तोंडातून यावयाचे. गुड मॉर्निंगचा सहर्ष स्वीकार करीत ते आपल्या जागेवर जायचे. हे नेहमीच घडत असायचे.

त्यावेळी बँक फोर्टमध्ये बँक स्ट्रीट वर होती. दिवाळीचे दिवस होते. दिवाळीत श्री.फर्नांडीस सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा देत असत. त्या दिवशी मी जेवून आपल्या युनियनच्या ऑफिससमोर उभा होतो. श्री.फर्नांडीससाहेब हे ऑफीसर्स मेसमध्ये जाण्यासाठी सात-आठ पायऱ्या चढून वर गेले. पण क्षणातच ते खाली आले व मला हात मिळवून Happy Diwali म्हणाले व ते जेवण्यास निघून गेले. मुद्दाम खाली येवून मला दिलेल्या दिवाळी शुभेच्छा मनाला आनंद देवून गेल्या.

१५/१६ वर्षानंतरची दुसरी आठवण अशीच. मी आपल्या वाडा ब्रँचला हेडक्लार्क म्हणून काम करीत होतो. श्री.फर्नांडीससाहेब हे तेव्हा रिजनल मॅनेजर (रिजन चार) होते. त्यांनी वाडा ब्रँचला अशीच धावती भेट दिली होती. ब्रँचमध्ये शिरताना दारातच मी त्यांना पाहिले व ओळखले. ते मॅनेजरच्या केबीनमध्ये गेले व तिथे बसून मॅनेजरशी गप्पा मारीत होते. केबीनला एक मोठी कांच होती. त्या कांचेतून श्री.फर्नांडीस साहेब सर्व स्टाफला न्याहळत होते. त्यांची नजर माझ्याकडे गेली. त्यांनी किंचित स्मित केले व मॅनेजरशी चाललेले बोलणे थांबवून ते माझ्या टेबलाशी आले. नावांनी ओळखून माझ्याशी हात मिळविला व माझी व माझ्या घरच्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. तसेच स्वत:ही बदली निमित्ताने कुठे कुठे जावून आले ते सांगितले व शेवटी म्हणाले काही अडचण असेल, मदत हवी असेल तर ऑफीसमध्ये न संकोच करता भेटा. एवढे बोलून ते पुन्हा मॅनेजरच्या केबीनमध्ये गेले. मॅनेजरसहीत सगळ्यांना आश्चर्य वाटले. मलाही वाटले. काम झाल्यावर ते निघून गेले.

आपल्या कनिष्ठ सहकाऱ्याला एवढ्या दीर्घ काळानंतर ते विसरले तर नव्हतेच पण त्याच्याशी शेवट आपलेपणानं (आपल्या पोस्टचा विचार न करीता) मोकळेपणानं बोलणं हे विरळाच. त्या विरळ व्यक्तिमध्येच श्री.फर्नांडीस साहेबांचा समावेश करावा लागेल.

-**द.श्री.विद्वांस,** ठाणे

अंतिम निर्णय घेण्याची क्षमता ह्या गुणांमुळे त्यांना त्यांच्या कार्यात उत्तम यश मिळत आहे. असेच यश त्यांना त्यांच्या पुढील समस्त कार्यात उत्तरोत्तर लाभो ही सदिच्छा !

''हाती घ्यावे सत्कर्म, तडीस न्यावे हा धर्म''-या वृत्तीने श्री विजय शेठ कार्यरत आहेत.

श्री.विजय शेठ ह्यांच्या सर्व समाज कार्याला 'संवाद' तर्फे शुभेच्छा!

लगे रहो विजय भाई !

**- वसंत धुपकर, पुणे**

## कृतार्थ जीवन

बहरले सौख्य आज दारी
जीव हा रमला संसारी ।।
छायेखाली माय पित्यांच्या
इवलासा जीव मोठा झाला
कौतुकामध्ये बाल्य वाढुनी
ये सौख्या भरती ।।१।।

सहवासाने गुरुजनांच्या
ज्ञानदीप तो येई हाता
बंधू, भगिनी सगे सोयरे
बळ हाता रे देती ।।२।।

मनासारखी सखी लाभली
तिच्या पदाने लक्ष्मी आली
सावरले मज कठीण समयी
कर देऊन हाती ।।३।।

तृप्त जाहले जीवन माझे
नुरले काही मिळवायाचे
दीन जनांची करण्या सेवा
नित बळ दे हाती ।।४।।

देवा आता काय मागणे
गावे नित मी जीवन गाणे
तव नामाची ओढ राहू दे
सदैव माझ्या मनी ।।५।।

**आर.जी.कडवेकर,** सातारा

## 'संवाद' लेख स्पर्धा २००७
## पुरुष विभाग - द्वितीय पारितोषिक विजेता लेख
## ''तुम्हा बायकांचे हे नेहमी असंच असतं''

मी मोठ्या जड अंत:करणाने ते पाकीट बंद केले आणि नेहमीच्या कुचेष्टेच्या उद्देशाने कळत नकळत माझे तोंडून उद्‌गार निघाले, ''तुम्हां बायकांचे हे नेहमी असंच असतं !''

जवळ जवळ अर्धशतक उलटून गेले आमचे सप्तपदीला. मधुचंद्राची सुरूवात सहस्त्रचंद्राचे दर्शन झाल्यावर सांगता करून संपन्न झाली. अनेक भूमिका भूषविल्या, अनेक पदे साकारली. गृहीणी-अर्धांगिनी-सहचारिणी-धर्मपत्नी-जोडीदारीण-कर्त्या पुरुषामागील प्रेरणा- दु:खात सहभागी होणारी सावली-ममता देणारी माया-नि:स्वार्थी माऊली-नटसम्राट व हिमालयाची सावलीमधील 'सरकार' आणि अगदी सोप्या सुटसुटीत शब्दातील माझी 'बायको'. आमचे बँकेचे भाषेत सांगावयाचे म्हणजे 'बुक ऑफ इन्स्ट्रक्शन' वाचा-मनन करा आणि आचरणात आणा. आयुष्यभर कुटूंबामध्ये तुम्हांला 'एफिशिअन्टली रन' म्हणून शेरा मिळेल. आणि काय पाहिजे?

परमेश्वराने म्हणे वरती या गाठी मारलेल्या असतात. खरं खोटं परमेश्वरच जाणे. कांही दिवसांनी कांही पत्रिकेतील ३६ गुण ६३ होतात कारण ''दिसतं तसं नसतं'' - पदरी पडलं आणि पवित्र झालं. ''आमचे पदरी कुठलं आले हे भाग्य ?'' असे उद्‌गार कानी पडतात आणि मन बेचैन होते. बायको बोलताना सडेतोड बोलते, पोटतिडकेने बोलते. त्यातले गांभीर्य मधासारखे शुद्ध आणि सात्विक असते. ''मी म्हणते उशीर होईल दोन घांस खाऊन घ्या'' - आतां कुठे जातां उन्हांत ?'' - ''मी म्हणते सगळ्याच गोष्टी आपण मनावर कशाला घ्याव्यात. झालं गेलं सोडून द्यावं - आपले कर्तव्य आपण करावं'' हे शब्द कानावर पडले की - पदरी पडलेले पवित्रच याची जाणीव होते, आपण मात्र सर्वांची टिंगल करतो.

सुरुवातीस नाविन्य कौतुकाने घर शाकारलेले-आई बाबांचे सावलीत-सासू सासऱ्यांचे सोबत वंशवेलीवर फुले उमजली-आनंदी आनंदात इकडे तिकडे स्थायिक झाली - कुटूंबातील थोरामोठ्यांच्या पडझडीनंतर उभयतांवर जेव्हा संसाराची जबाबदारी पडली- तेव्हां 'संवाद' मधील 'वाद'- मनामनांचा मेळ जुळावा - सादासी प्रतिसाद मिळावा', 'वाद नको संवाद असावा' या घडीपर्यंत आला. कळत नकळत उणं-दूणं निघू लागले. 'तुझं तूं बघ' - 'मला हे असं हवं' - 'पैसे पुरत नाहीत म्हणजे काय ?' अशी विचारणा होऊ लागली. उलट टपाली 'तुम्हांला व्यवहार ज्ञान नाही' - 'तुम्ही वेंधळे आहांत', 'मी सांगते ते ऐका' - 'मी या घरची कोण ? , मालकीण कां मोलकरीण' - 'माहेरीच कशी जाते' म्हणून रेल्वेचे बुकींग-मग अबोला-मन:स्ताप-मंथन-मध्यस्थ-मध्यंतर-मनधरणी-संगीत-मानापनात-संशयकल्लोळ-भावबंधन-एकच प्याला-आणि-शेवटी-

हिमालयाची सावली व नटसम्राट-कुणी आमची समजूत घालता कां समजूत ?

जसजसे वय वाढत गेले तसतसे माझ्यानंतर बायकोचे कसे होणार या विचाराने माझे मन बेचैन होऊ लागले. रात्री झोपेची गोळी घेऊन सुद्धा-पहाटेचे पांचपर्यंत घड्याळ्याचे टोले-मी न चुकता मोजत होतो. कुणी सांगावे देवाचे मनी काय आहे ? -याचा शोध घेत होतो. ढासळलेल्या एकत्र कुटूंब पद्धतीमुळे- पै पाहुणा-चांगल्या ब्लड बँकेत शोधावा लागतो. मग ''तू दमलीस कां ?'', ''तू जेवलीस का ?'', तूं औषध घेतलेस कां ?'' हे शब्द कानावर कधी पडणार ? अनाथाश्रमातला आश्रय- अवहेलना-अखेरचे अपमान-आपले ओठी असेल कां ? या विचाराने मी 'मृत्यूपत्र' तयार केले आणि बायकोजवळ वाचण्याचे धाडस केले.

''मी बघून ठेवलंय, तुमचं हे नेहमीचंच आहे'' ? इतक्या लवकर तिरमिरीची भाषा कशाला ? जसं काही ब्रह्मदेव भेटला होता आणि तुम्हांला 'ड्यू डेट' सांगून गेला.''

''अगं तसं नाही पण हे बघ हे पेन्शनचे पुस्तक माझ्यानंतर तुला इतके पेन्शन मिळेल, हे मेडिकल बेनिफिटचे पुस्तक-अजून दोन लाख शिल्लक आहेत-हा फॉर्म हा नमुना अर्ज'' मी म्हणालो.

''अहो आजपर्यंत मी तुमचे पैशाला कधी हात लावला आहे कां ? कां काही कमी पडते म्हणून कुरकूर केली ? हे सगळं बरोबर का नेणार आहोत ? तुम्ही कष्टाने मिळवले-उभयतांनी आनंदाने उपभोगिले-उरले सवरले शेवटपर्यंत पुरेल-कशाला काळजी करता?''

मी परत निरुत्तर झालो आणि रागाने-''उद्या माझे बरे वाईट झालं तर मला काय ठेवलंय, किती ठेवलं-कुठे ठेवलं-म्हणून दुसऱ्याकडे सांगू नकोस-इतकेच'' - कागदपत्राची पिशवी उशालाच ठेवतो असे सांगून गादीवर आडवा झालो.

जमिनीवर हात टेकून ती उठली व भिंतीचे आधाराने उभी राहिली, अमृतांजन लावल्याचा वास येत होता, उशाशी कपभर दूध आणून ठेवले. सकाळ-संध्याकाळ औषधाच्या गोळ्या आठवणीने घ्या. उन्हाळ्यात गुलकंद घ्या म्हणजे उन्हाचा त्रास होणार नाही-हिवाळ्यात च्यवनप्राश घ्या म्हणजे शक्ती आणि पावसाळ्यात -मोरावळा'' असे सांगत देवघरांत देवाला नमस्कार करून कोपऱ्यात मुटकुळे करून झोपली.

सकाळी सूर्य उगवला पण स्वामिनीला नाही जाग आली. संसार सुखाचे कुशीतल्या कुडीने केव्हा अखेरचा श्वास घेतला - हे कोणालाच कळले नाही-उमगले नाही आणि उलगडणार पण नाही.

अखेरच्या निरोपाची तयारी झाली आणि तिच्या उशाखाली एक पाकिट सापडले. पाकीटात एक चिठ्ठी सापडली-आणि चिठ्ठीत चारच ओळी होत्या. निर्मळ मनाने-नम्रतेने भरलेल्या-नतमस्तक करणाऱ्या- ''परमेश्वरा मला सवाष्णपणी मरण येऊं दे-सुखाने संसार केला-समाधानाने न्हाऊन निघाले-आयुष्यभर यांनी माझी काळजी घेतली. माझे नंतर यांचे कसे होईल ही काळजी आहे. पण हा स्वार्थ-होय स्वार्थ-विवाहात मारलेली गाठ निरगांठ करणारा आहे मला सुरगांठ हवी आहे-सोडवशील ना?''

माझे नेहमीचे सवयीने मी नेहमीचेच वाक्य बोलून गेलो. ''तुम्हां बायकांचे हे नेहमी असंच असतं !'' कसं असतं ?-

मला पामराला काय विचारतां ?

**- मधुकर पालकर**, पुणे

## शल्य प्रेमाचं

*पुष्कळांच्या आयुष्यात असंच घडतं*
*स्वत:जवळचं काय ते कळत नसतं*
*दुसऱ्याजवळ आहे ते हवंसं वाटतं*
*मुद्दल व्याज देवून प्रेम करावंसं वाटतं*
*सरते शेवटी ते मृगजळ ठरतं ॥१॥*
*पुष्कळांच्या............*

*केलेलं प्रेम एकतर्फी असतं*
*उघडपणे सांगायचं धाडस नसतं*
*प्रियकर/प्रेयसीला भेटावसं वाटतं*
*ते जमत नाही म्हणून चिडचिडायला होतं ॥२॥*
*पुष्कळांच्या............*

*प्रितीच्या हिंदोळ्यावर झुलायला होतं*
*विरहाच्या डोहात बुडायला होतं*
*बेसावध क्षणी शुभमंगल होतं*
*पतीपत्नीचं प्रेम पारंपारिक ठरतं ॥३॥*
*पुष्कळांच्या............*

*दिसतं तसं नसतं म्हणून जग फसतं*
*कुथायचं, झुरायचं नशिबी येतं*
*सगळं आयुष्यच होरपळून जातं*
*प्रेमाचं शल्य मनातच रहातं ॥४॥*
*पुष्कळांच्या............*

*- **प्रभाकर कानिटकर***

# ✻ प्रथम वार्षिक स्मृतिदिन ✻



**स्व. सौ.रूपाली रविंद्र मुजुमदार**

मृत्यु दि.१७ ऑगस्ट २००६

असा एक क्षण नाही, असा एक प्रसंग नाही
जेव्हा तुझी आठवण येत नाही, तुझी उणीव भासत नाही

प्रथम वार्षिक स्मृतिदिनाप्रित्यर्थ साश्रू नयनांनी
तुझ्या पवित्र स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली.

– रवी (पति)

– अमृता (मुलगी)

माहीम, मुंबई – ४०००१६

Advt.

## 'संवाद' लेख स्पर्धा २००७
## स्त्री विभाग- द्वितीय पारितोषिक विजेता लेख
## ''मी बघून ठेवलयं तुमचं हे नेहमीचचं आहे''

शाखेत हलकेफुलके आनंदी वातावरण असे. ११ च्या सुमारास मला केबीनमध्ये बोलवले. तेथे आणखी २-४ स्टाफ मेंबर्स होते.

श्री. डिमेलो - ''आज काय विशेष ?''

मी जरा गोंधळलेच - ''काही नाही.''

श्री. डिमेलो - ''नक्की'' ?

मी - ''नाही. काहीच नाही.''

श्री. डिमेलो - 'ठीक आहे तुम्ही जा.''

मी जागेवर येऊन बसले. मनात म्हटले, ''बरे झाले यांना काहीच समजले नाही ते .''

दुपारी ४ वा. चहा व बिस्किटे आली. मी चौकशी केली. ''कोणाची ट्रीट ?'' माहीत नाही. पण सर्वजण हसत होते. मला काहीच कळेना. थोड्या वेळाने मेसेंजर येऊन म्हणाला, ''बाई १५० रूपये बील झाले, तुम्हाला द्यायला सांगितले आहे, ते बाहेर उभे आहेत त्या साहेबांनी. मी बाहेर पाहिले तर आमचे हे उभे. माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मग मोठा हशा पिकला. टाळ्या वाजवून माझा वाढदिवस साजरा झाला. स्वारींनी सकाळीच बँकेत फोन करून माझ्या वाढदिवसाची बातमी सांगितली होती. चहा व बिस्किटेही उकळायला सांगितले होते. माझा पगार तेव्हा ५५० रूपये होता. माझ्याकडे कदाचित् पैसे नसतील म्हणून देण्यासाठी बाहेर आले होते. ह्याचं हे असं नेहमीचचं आहे.

त्यावेळी आमच्या शाखेचे डिसेंबरमध्ये मोठे स्नेहसंमेलन व्हायचे. ६०-७० स्टाफ होता. निरनिराळ्या स्पर्धा व्हायच्या. करमणुकीचे कार्यक्रम, बक्षीस समारंभ व नंतर जेवण असायचे. स्पर्धा सोडल्या तर बाकी सर्व कार्यक्रमास घरची मंडळी असायची. मी कॅरममध्ये भाग घेतला होता. पण बक्षीस मिळाले नव्हते. तरीसुद्धा नवीन लग्न झालेले असल्याने मी ह्यांना कार्यक्रम पहायला कौतुकाने बोलावले. कार्यक्रम सुरू झाले. चांगलेच रंगले. शेवटी इतर कुणाला काही सादर करायचे आहे का विचारले. ह्यांनी अचानक हात वर केला. मी गडबडलेच. ह्यांना काही गाताबीता येत नव्हते. नृत्य तर अशक्यच. गोष्ट सांगणार की काय ? बापरे ! आता हे काय नवीनच ? मला तर काहीच बोलले नव्हते. देवा ! आणि कविता वाचन सुरू झाले.

''संमेलन गॅदरींग, गॅदरींग संमेलन.
कुणाला मिळाला कप,
कुणाला मिळाली फ्रेम !
आम्हांला मात्र मिळाली
लव गेम ! ''.......

आणि असे बरेच काही.

सर्वजण हसत होते. टाळ्या वाजवीत होते. मी मात्र डोके धरून बसले होते. ''नाही मला बक्षीस मिळाले म्हणून काय झाले ? हे असे जगजाहीर करायचे ? काही गरज होती का ?''

शेवटच्या ओळी ऐकल्या.

''तुम्ही सारे करा आता मजा,
आम्हाला मात्र घरी मिळणार आहे सजा.
संमेलन गॅदरींग, गॅदरींग संमेलन.''

घरी गेल्यावर हे समजूत काढू लागले.

''अगं गंमत केली जरा, एवढी काय रागावतेस ?''

''काही सांगू नका, तुमचं हे नेहमीचचं आहे.''

मुलगी ३-४ वर्षांची होती. तिचे सर्व आवरून स्वयंपाक वगैरे करून बँकेत जायचे म्हणजे कोण धावपळ व्हायची. ह्यांना कामाची अजिबात आवड व इच्छा नाही. चहा सोडला तर अजूनही काहीच करता येत नाही. आपली कितीही धावपळ होत असली तरी हे निवांत. तोंडापुढे पेपर !

एक दिवस अचानक मोलकरणीचा निरोप आला येणार नाही म्हणून. मला खूपच टेन्शन आले. आता कसे आवरायचे ? ह्यांना काय उपरती झाली, कुणास ठाऊक. म्हणाले, ''काळजी करू नकोस. मी सगळी मदत करतो.'' मनात म्हटले, ''देव पावला.'' ह्यांना काहीच येत नसल्याने प्रत्येक गोष्ट सांगून करून घेतली. म्हणजे असे की चहा करा, बादलीत साबण व पाणी घेऊन कपडे भिजवा, भाजी चिरा, काड्याबिड्या उचला. इत्यादी इत्यादी. कसेबसे आवरून मी बँकेत पोहोचले. मनात एकदम आनंदून गेले होते. लग्नानंतर पहिल्यांदाच ह्यांनी मला अशी मदत केली होती. बायकांना कुठल्या गोष्टीचा आनंद होईल सांगता येत नाही. मी मैत्रिणींनाही कौतुकाने सांगितले. संध्याकाळी घरी आले तर हातात कविता पडली!

''दिन उजाडता होतो कावरा बावरा,
बापुडा दीनवाणा, ताटाखालचा नवरा !
अहो उठा उठा, आला आला नळ,
माझ्या जीवा बादली घेऊन पळ !
अहो अहो बघा गवळी आला
तुम्ही करता किती चहा चांगला !
आधी आता करा या भाजीचे तुकडे,
निरमा टाकून टबात भिजवालना कपडे,
अन् बरं का गडे, जरा लवकर लवकर आवरा,
बापुडा दीनवाणा ताटाखालचा नवरा !''

असे बरेच कांही हातभर लांब !

ह्यांना आता काय म्हणायचे सांगा ? आयुष्यात एका सकाळी बायकोला थोडी मदत केली तर लगेच कविता ? जाऊ देत. ह्यांचे हे नेहमीचेच आहे.

त्यावेळी टी.व्ही. नवीनच आले होते. ज्यांची परिस्थिती उत्तम आहे त्यांच्याच घरी दिसायचे. बँकेतून आल्यावर मी घरी एकटीच असायची. मुलगी खेळायला जायची. ह्यांना दवाखाना बंद करून

घरी यायला रात्रीचे ११ तरी वाजायचेच. मला खूप कंटाळा यायचा. बऱ्याचदा तगादा लावला की आपण टी.व्ही. घेऊ या. पण नांव नाही. टी.व्ही.चे सर्व फायदे सांगून झाले. थोडे रूसून, रडून झाले पण काही उपयोग नाही. मग एकदा माझ्या मैत्रिणीने फ्रीज घेतला. रोज ती मला फ्रीजचे उपयोग सांगायची. मला पण खूप वाटायचे फ्रीज यावा. स्वप्नात दिसायचे की कोणीतरी आपल्याकडे आले आहे आणि आपण फ्रीजमधील उकडलेले बटाटे काढून वडे तळले आहेत. मग मी टी.व्ही.चा नाद सोडून फ्रीजच्या मागे लागले. रोज झोपण्यापूर्वी फ्रीजस्तवन सुरू झाले. पण हे ढीम्म ! ह्यांना दोन्हीतही इंटरेस्ट नव्हता. मग मी पण वैतागून म्हणाले, ''जाऊ देत आपले नशीबच फुटके ! हे असेच वागणार.''

आणि एक दिवस दारात टेम्पो उभा राहिला. ''डॉक्टर निरगुडकर इथेच राहतात ना ?'' मी हो म्हटले. ''डिलिव्हरी घेऊन आलोय टी.व्ही. आणि फ्रीजची.'' ''काय ?'' मी उडालेच. टी.व्ही. आणि फ्रीज दोन्ही एकदम ! हे अस्सं आहे बघा ह्यांचं !

असेच एक दिवस सकाळी पेपर चाळत होते आणि अचानक काय दिसले तर ह्यांचा फोटो ! हातात चक्क खराटा घेऊन ? तोही 'सकाळ' मध्ये ! आता मात्र कहरच झाला. स्वच्छता अभियाना अंतर्गत एक लेख आला होता व मधोमध ह्यांचा स्वच्छता करताना फोटो ! मी कपाळाला हात लावला. मनात म्हटले आत्ताच्या आत्ता त्या 'होम मिनिस्टर'वाल्या बांदेकराला बोलवावे आणि सांगावे की ह्यांना घरातला झाडू शोधून आणायला सांग ! मग बघू देत सगळ्या दुनियेला फजिती. फोटो छापताहेत खराटे घेऊन ! तेही 'सकाळ' मध्ये ! मला माहीत आहे ह्यांचे हे नेहमीचेच आहे.

माझी २८ वर्षे नोकरी झाली. घरगुती अडचणींमुळे मी स्वेच्छानिवृत्ती घेतली. माझ्या निरोप समारंभाच्या दिवशी माझी मुलगी व हे मला न्यायला आले. मी खूपच संमिश्र भावनांत होते. सर्वांची भाषणे झाली. कौतुक, स्तुती झाली. मग हे बोलायला उभे राहिले. ''आमच्या कनिष्ठ मध्यमवर्गीय घराला कष्ट करून हिने वर आणले'' म्हणून जी सुरवात केली ते १५-२० मिनिटे बोलतच राहिले. खूप कौतुक केले. माझ्या डोळ्यांना धारा लागल्या. माझ्या अधिकारी व सहकारी बंधू भगिनींसमोर माझ्या प्रामाणिकपणाची, सिन्सीॲरिटीची, कष्टाळू स्वभावाची खरी पावती मला मिळाली. मी भरून पावले. आयुष्यात देवाने जे काही दिले आहे ते असे भरभरून दिले आहे. त्याची मी कृतज्ञ आहे. पण तरीसुद्धा चार चौघात बायकोचे इतके कौतुक करायचे का ? अहो ह्यांचे हे नेहमीचेच आहे.

तर मंडळी, असा आमचा संसार खुसखुशीत व खुमासदार आहे. यांच्या कवितांनी तर मला बेजार केले आहे. मी स्पर्धेसाठी लेख पाठवीत आहे खरी पण मनांत भीती आहेच, न जाणो पुढच्या संवादच्या अंकात यावर एखादी कविता छापून यायची ! ह्यांचं हे नेहमीचंच हो !

**- सौ.सुरेख निरगुडकर,** पुणे

## आठवणी दाटतात.....
## मूनलाईटचे दिवस

मुंबईत LHO ला मी रिपोर्ट झालो. घरासाठी लांब वेटींग लीस्ट आहे असे समजले. गेल्या गेल्या राहणार कोठे ? मूनलाईट गेस्टहाऊसमध्ये जागा मिळवण्यासाठी सेंट्रल ऑफीसच्या लायझन डिपार्टमेंटमध्ये गेलो. एका करड्या डोळ्याच्या मिशीवाल्या माणसाकडे भीत भीत विचारणा केली. कडक आवाजात ते फोनवर कुणाशी तरी बोलले आणि मला म्हणाले, यतुम्हांला कॉट नं. पाच दिलीय स्लीप घेऊन तिथे जा.

जुलैमधल्या त्या पावसाळी दुपारी मी मूनलाईटला पोचलो. 'फास लाया है क्या ?' एका काळ्या बुटक्याशा मुलाने प्रश्न केला. तो काली–कालीचरण–तिथला केअरटेकर होता. स्लीप बघून त्याने मला आंत घेतले.

भरदुपारी आतमध्ये कोंदट अंधारी शांतता. दारासमोरच सहाफुटी गोलटेबल, कडेनी लोटस चेअर्स, मागे दोन सोफा चेअर्स, त्याच्यामागे पार्टीशन. उंच उंच छत. त्याला लांब लांब पंखे टांगलेले. इंग्लीश पद्धतीच्या लांब खोल बाथरूम्स, काटकोन साधून क्युबिकल्स केलेल्या त्यात कॉटा टाकलेल्या. कॉटशेजारी एक कपाट आणि रिडींग लँप.

मी माझे सामान लावून परत यकज्ञ ला गेलो. 'मूनलाईट' स्टेट बँक भवनजवळ डावीकडे सचिवालयानंतरच्या पेट्रोल पंपाला लागून असलेली कोपऱ्यावरची इमारत. तळमजला बँकेने खूप दिवसांपासून भाड्याने घेऊन तिथे गेस्टहाऊस केलेले. सेंट्रल ऑफिसच्या लायझन डिपार्टमेंटकडे त्याचा कंट्रोल होता. ते कडक आवाजात बोलणारे साहेब खूप को-ऑपरेटिव्ह होते. कॅप्टन रानडे त्याचं नांव. नंतर ते माझे मित्र झाले.

संध्याकाळी मूनलाईटला परत आलो. दुपारी शांत असलेले मूनलाईट आता गजबजलेले होते. टी.व्ही.चालू होता. गोलमेजाभोवती लुंगी आणि शॉर्टस्मध्ये मंडळी बोलत बसली होती. मेजावर इंग्रजी पेपर पडले होते. सगळेजण कामावरून थकून आलेले माझ्यासारखेच, बदली होऊन आलेले, घराच्या प्रतीक्षेत असणारे. त्यांच्याशी ओळख झाली. रात्र आनंदात गेली.

दुसरे दिवशी सकाळी उठून क्युबिकल्सच्या बाहेर आलो. टॉयलेटच्या दारात रांगा. प्रत्येकाच्या तोंडात ब्रश, डाव्या हातात दाढीचे सामान आणि मनगटावर आंघोळीचे कपडे. मंडळी पाय वाकडा करून तिष्ठत उभी. बेसीन, टॉयलेट, बाथरूम एकत्रच. आत गेलेला माणूस सगळं आटोपूनच बाहेर यायचा. गर्दीमुळे दुसऱ्यांचा नंबर लागणं कठीण. वेळेत जायची सगळ्यांनाच घाई.

बऱ्याच प्रतीक्षेनंतर माझा नंबर लागला. रोज असंच चालायचं.

सकाळी सगळे नळ चालू असल्याने पाणी बारीक येई. बादलीत मग बुडेल एवढे पाणी साठायला दहा मिनिटं लागत. दुष्काळात तेरावा महिना.

रविवारी निवांत असे. तेव्हा लोक मनसोक्त आंघोळ करीत. धोबीघाट काढीत. ही सकाळची रांग टाळण्यासाठी काही जणांनी पहाटे उठून अन्हिकं उरकायला सुरूवात केली.

एक साहेब एकदा लवकरच उठले. बाथरूम सताड मोकळ्या होत्या. आंघोळ उरकून, लुंगी मारून, भस्म लावून कालीला चहा मागायला किचनमध्ये गेले. तिथे घड्याळात पाहिले तर रात्रीचे तीन वाजलेले.

पश्चिमेच्या कोपऱ्यात डाव्या हाताला एक खोली होती. तिचे दार नेहमी लोटलेले असे. तिथले दोघेजण सकाळच्या गर्दीत दिसत नसत. एक दिवस ते दार मी हळूवार ढकललं. आंत आणखी एक दार दिसलं. पुढे जाऊन तेही ढकलले. मला अमेरिका सापडलेल्या कोलंबसचा आनंद झाला. तिथे भारतीय टॉयलेट होते. त्या दिवसापासून मी माझी तिथे वहिवाट लावली.

केअरटेकर कालीचरण नावाप्रमाणे काळा होता पण प्रेमळ होता. लहान असूनही पोक्तपणे वागायचा. नॉर्मली गंभीर असे. कमरेला चटपटी लुंगी वर उघडा बंब. गळ्यात जानवे, त्यातून नेहमी उजवा अंगठा फिरवी. चमचमते काळे शरीर. डोक्याला पचपचीत तेल असा होता.

तो आमच्यासाठी चहा, नाश्ता आणि रात्रीचे जेवण बनवी. खूप काम असल्याने तो गंभीर व घाईत असे. क्वचित हसे तेव्हा ते हसणे गोड वाटत असे. रोज रात्री स्वयंपाक झाल्यावर, तो आवाज देई. शर डिनर रेडी. य तो स चा श करी. लगेच मंडळी खाटावरून उठून गोलमेजाभोवजी जमत. खुर्च्या पकडत. दोन–तीन पंगती होत.

कालीचं जेवण साधच होतं. दाल, भात, चपाती, भाजी, कांदा, दही. त्या जेवणाचं आकर्षण वाटायचं. आम्ही भुकेलेले असू. जेवणावर ताव मारत असू. पहिली पंगत मिळावी म्हणून नंतर काही मंडळी संध्याकाळी ऑफिसातून आल्यावर फ्रेश होऊन खुर्चीवर टी.व्ही. पहात जी बसत ती जेवण उरकेपर्यंत. इतरजण वाट पहात त्यांच्यामागे उभे राहत. आमचं झाल्यानंतर काली रात्री अकरा वाजता जेवत असे.

एकदा बदल म्हणून पुण्याहून येताना मी घरून शेंगदाण्याची चटणी आणली. जेवतांना बाटलीमधे ठेवली. लाल रंगाला लोक घाबरले. मी दही घालून चटणी खायला सुरूवात केली. बाकीच्यांनी घाबरत नमुन्याला थोडी घेतली आणि पावशेराची बाटली घाबरत लगेच रिकामी केली. पुढे मग मी नेहमीच घरून चटणी आणायला लागलो.

मूनलाईटमध्ये सर्व सर्कलमधून आलेली, सेंट्रल ऑफिसमध्ये वेगवेगळ्या डिपार्टमेंटमध्ये कामं करणारी मंडळी होती. आपोआप मित्रगट बनले. एकत्र फिरणे, गप्पा, घरची खबरबात, चिठ्ठी आयी है, फोन किया है वगैरे चालायचे. घरापासून हजारो मैल दूर आलेले, लहान मुलं, पत्नी गावाकडे एकटे, म्हणून चिंता, अस्वस्थता. क्वार्टर मिळणे हा सगळ्यांचा जिव्हाळ्याचा विषय. घराची वेटींग लिस्ट किती वर सरकली ह्याची बातमी कुणीतरी आणीत असे. आशा उंचावत किंवा मावळत. कधीतरी एखाद्याचा चेहरा खुललेला दिसे की ओळखावे त्याला क्वार्टर मिळाली. मग सगळेजण त्याची पाठ थोपटत. त्याचा ग्रुप त्याला सोडायला टॅक्सीतून त्याच्या क्वार्टरपर्यंत जाई. घरच्या जेवणाचे आमंत्रण दिले जाई.

काही दिवसांनी मी पश्चिम कोपऱ्यातल्या खोलीत शिफ्ट झालो. तिथे खिडकी होती. रात्री समुद्रावरचा वारा यायचा. सामानाची चोरी होते म्हणून मी झोपताना खिडकी बंद करायला लागलो. या आधी तिथे राहणारे अधिकारी ती बंद करत नसत. उदय सोहोनी पण तिथे होते. त्यांनी त्याचे कारण सांगितले. ते अधिकारी एवढे चलाख होते की चोरांनी खिडकीतून हात घालून काही उचलायच्या आतच चोराची अंगठी किंवा घड्याळ गेलेलं असेल.

मी, गिजरे, उदय सोहोनी, भरत गुप्ते, अण्णे गिरी असा आमचा मूनलाईटचा पुणेकर ग्रुप होता. विजय भावेही त्यात होते. शनिवारच्या प्रगतिने पुण्याला आणि सोमवारच्या डेक्कनने मुंबईला. गप्पा मारत, चहा पीत दर आठवड्याला पिकनिक सारख्या ट्रीपा व्हायच्या.

मूनलाईटमध्ये गैरसोयी असल्यातरी त्याचं आकर्षण होतं. समोरचं ओव्हल मैदान, नारळाच्या झाडीतलं, राजाबाई टॉवर, मुंबई विद्यापीठ, हाकेच्या अंतरावर गेट वे, नरिमन पॉईंट. ह्या अल्हाददायक गोष्टी होत्या. मरिनलाईन्सला समुद्राच्या कडेनी तिथल्या उच्चभ्रू नागरिकांसमवेत अर्धी चड्डी घालून पहाटे फिरायला जाताना स्वप्नात असल्यासारखं वाटायचं. असे दिवस जात असताना एक दिवस बातमी आली बँक मूनलाईट रिकामं करणार आहे व जागा मालकाच्या ताब्यात देणार आहे. सगळ्यांच्या डोळ्यासमोर काजवे चमकले. आतां जायचे कुठे ? रहायची काय सोय ? घर मिळत नाही. बदली नाही.

दोन आठवड्यातच तो काळा दिवस उगवला. मूनलाईटच्या दारात ट्रक येऊन थांबला. एकेक वस्तू तीत चढवली गेली. आमच्या बॅगा पण. मूनलाईट उजाड झाले. तो ट्रक गोरेगावला गेला आणि हे मूनलाईट गोरेगावच्या सनराईज टॉवरमध्ये विलीन झाले. गेस्टहाऊसचे एक पर्व संपले.

परवा कार्पोरेट सेंटरला जाताना मूनलाईट शेजारच्या फूटपाथवर उभा राहिलो. मूनलाईटमध्ये आपलं कांही नाही ते आपण सोडलंय हे जाणवून खिन्नता आली. क्षणभर कालीचरण दारात उभा असल्याचा भासही झाला.

थोडा वेळ रेंगाळलो. एखादी वास्तू मनांत घर करते. पुनर्दर्शनाने हळवी करते. तेच मूनलाईटनी केलं. आपलं खूप कांही गेलंय असं वाटायला लागलं. कायमची रूखरूख ठेऊन गेले ते मूनलाईटचे दिवस.

**– चंद्रकांत कुलकर्णी, पुणे**

*******

Regd. under RNI No. MAHBIL04149/13/1/2003-TC & Declaration No. PHM/SR/12/VIII/2004
SSPO Pune under Postal Concession register No. L2/RNP/M/318/04-07 Date :13/05/2004
Licence to post without Prepayment No. : LWP-217 at Market Yard PSO, Pune - 37
on 25th of each Month

## डोळ्याच्या बुबुळावरील जखमेवर शिवांबुने मात - एक अनोखा अनुभव !

माझ्या आईच्या (वय ८४) बुबुळाला कशाने तरी जखम झाल्याने असह्य वेदना होत. रात्रभर झोप नसे. नेत्रतज्ञ डॉ.निर्मला सरपोतदार M.S.,D.N.B. (Opthalmology) यांनी सांगितले Gatilox, Tropieal Plus, Oflox, Itral, Diamox, Genteal चा औषधांचा उपयोग न झाल्याने Grafting ऑपरेशनचा एकच उपाय उरल्याच्या निष्कर्षाला डॉक्टर आल्या. मी डॉक्टरांना म्हटले, ''मी माझ्या जबाबदारीवर डोळ्यात शिवांबु टाकतो. मी गेली ३६ वर्षे मी शिवांबु पोटात घेत आहे. त्याने काहीही अपाय होत नाही याचे उदाहरण मी स्वत: आहे. पूर्वी म्हणत असत की तो अमका माणूस इतका वाईट आहे की कापल्या करंगळीवर मूत म्हटले तरी मूतणार नाही. याचा अर्थ जखम बरी करण्याचा मानवी मूत्राचा गुणधर्म पूर्वीच्या पिढ्यांना माहीत होता. डॉक्टर म्हणाल्या की त्यांच्यावर जबाबदारी नसल्यास चालेल.

नंतर २ आठवडे रोज ७-८ वेळा शिवांबुचे ५-६ थेंब टाकून डॉक्टरांना दाखवले. त्या म्हणाल्या, ''सुधारणा आहे. चालू ठेवा.'' त्यानंतर ३ आठवडे शिवांबु टाकल्यावर डोळेदुखी पूर्ण थांबली. डॉक्टरांना दाखवले. त्या म्हणाल्या, ''७० टक्के सुधारणा आहे. २-३ आठवड्यात पूर्ण बरे होईल.'' नंतर ४ आठवडे शिवांबु टाकले. पूर्वी भुवईला धक्का लागला तरी दुखत असते. आता पापणी दाबली तरी दुखत नसे. डॉक्टरांना दाखवले. त्या म्हणाल्या, ''आता जखम १०० टक्के बरी झाली आहे.'' त्यावेळी आईला वाचायला दिसत नसे. मी आणखी चार महिने शिवांबु टाकणे चालू ठेवले. आई दै.सकाळमधील बारीक अक्षरातील मजकूर, साप्ताहिके, मासिके, पुस्तके सर्व वाचू लागली.

मला वाटते की निसर्गाने जसे तान्ह्या बाळासाठी आईच्या अंगावरचे दूध दिले आहे तसेच मानवाच्या आरोग्यरक्षणासाठी व त्याला बलवान करण्यासाठी शिवांबुचे वरदान दिले आहे. मानवी मूत्र टाकाऊ व विषारी आहे ही अंधश्रद्धा सोडून देऊन आपण केव्हा व किती प्रमाणात शिवांबु घेतल्यास जास्तीत जास्त फायदा होतो हे प्रत्येकाने अनुभवून त्याप्रमाणे घ्यावे यातच आपले कल्याण आहे. या विषयात डॉक्टर लोकांनी संशोधन करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

या संदर्भात नेत्रतज्ञ डॉ.निर्मला सरपोतदार यांच्या मतेदेखील मानवी मूत्राचा वैद्यकीय उपयोग या विषयावर अधिक संशोधन होणे आवश्यक आहे. कारण अशा उपचारांना संशोधनाचा शास्त्रीय आधार असावयास हवा.

**- श्री.विजय वामन आगाशे, पुणे.**
दूरध्वनी : २४२२३२४३.

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**प्रकाशक :** श्री. रा. ना. लळिंगकर, सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे.
**संपादक मंडळ :** सर्वश्री. वसंत धुपकर, प्रभाकर गुपचुप, शरद शिंगवेकर, श्रीधर सहस्रबुद्धे, क्रांतिसेन आठवले
**मुद्रक :** संविज्ञान इन्फोटेक प्रा. लि., ४९/७६३ लोकमान्य नगर, नवी पेठ, पुणे-३० फोन : २४३३५३०५, २४३३५३२४, ३२५४११५९